## MAHARASHTRA ACT No. XXXV OF 1984.

## THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) (RETROSPECTIVE EXTENSION OF DURATION) ACT, 1984.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २० डिसेंबर १९८४ रोजी मिळाली असल्यामुळे, तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**डी. एन. चौधरी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXV OF 1984.

## AN ACT TO EXTEND THE DURATION OF THE MAHARASHTRA RAW COTTON (PROCUREMENT, PROCESSING AND MARKETING) ACT, 1971, WITH RETROSPECTIVE EFFECT.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २१ डिसेंबर १९८४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

### सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

**महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत पूर्वलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत पूर्वलक्षी प्रभावाने वाढवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांना तातडीने कार्यवाही करणे आवश्यक ठरावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती; आणि म्हणून त्यांनी दिनांक ८ सप्टेंबर १९८४ रोजी महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९८४ प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहेत :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.** १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अधिनियम, १९८४ असे म्हणता येईल.

(२) तो, ३० जून १९८४ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा.** २. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा "मुख्य अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) याच्या कलम १, पोट-कलम (४) मध्ये, "१९८४" या आकड्याऐवजी "१९८६" हा आकडा दाखल करण्यात येईल. १९७१ चा महाराष्ट्र ४७.

**व्यावृत्ती.** ३. या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कोणत्याही व्यक्तीने, दिनांक ८ सप्टेंबर १९८४ पूर्वी केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती जर मुख्य अधिनियमान्वये अपराध ठरत नसेल परंतु या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाची मुदत पूर्वलक्षी प्रभावाने वाढवल्यामुळे ती अपराध ठरत असेल तर, अशा कोणत्याही कृतीसंबंधीच्या अपराधाबद्दल ती दोषी ठरणार नाही.

**शंका निवारण.** ४. शंका निवारणासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, ३० जून १९८४ नंतर ज्याची मुदत समाप्त होणार होती अशा मुख्य अधिनियमाची मुदत, या अधिनियमाद्वारे, ३० जून १९८६ हा दिवस धरून त्या दिवसापर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने वाढवण्यात आली असल्याने, ती केव्हाही समाप्त झाल्याचे कोणत्याही वेळी समजण्यात येणार नाही आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे त्याचे सर्व उपबंध हे, या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींस अधीन राहून, सातत्याने अमलात असल्याचे मानण्यात येईल.

**सन १९८४ चा महाराष्ट्र अध्यादेश ७ याचे निरसन व व्यावृत्ती.** ५. (१) महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (पूर्वलक्षी प्रभावाने मुदत वाढवणे) अध्यादेश, १९८४ हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

(२) अध्यादेश अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरी, उक्त अध्यादेशाद्वारे, सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाअन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही या अधिनियमाद्वारे सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

**न. ब. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई